# जिल्हा परिषद,यवतमाळ
## मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय
## शिक्षण विभाग,प्राथमिक
## जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत,आर्णी रोड,यवतमाळ

E-mail – copriytl@gmail.com
Website:-www.zpyavatmal.gov.in

जा.क्र.यजिप/शिविप्रा/आस्था-प्राथ/कावि/२६२२/२०२६
दिनांक ०९/०९/२०२६

**अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी-२०२५**

**वाचा:-या कार्यालयाचे प्रसिध्दी पत्रक दि.०८/०९/२०२६**

## जाहीर सुचना

शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी-२०२५ नुसार शिक्षण विभाग प्राथमिक जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत मुलाखतीशिवाय पदनिवडीचा विकल्प दिल्यानुसार पवित्र पोर्टल प्रणालींतर्गत शासनाने शिफारस केलेल्या शिक्षक पदभरतीतील एकुण ५१० उमेदवारांची निवड यादी कार्यालयास प्राप्त झाली आहे. त्यानुसार संदर्भीय क्र.३ चे आदेशाद्वारे नियुक्त तपासणी पथकाद्वारे दिनांक ०२/०९/२०२६ ते दिनांक ०४/०९/२०२६ या कालावधीमध्ये शिफारस पात्र उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात आलेली आहे.

त्यानुसार शिक्षण विभाग (प्राथमिक)जिल्हा परिषद,यवतमाळ अंतर्गत पवित्र पोर्टल प्रणालींतर्गत शासनाने शिफारस केलेल्या शिक्षक पदभरतीतील एकुण ५१० उमेदवारांना समुदेशनाद्वारे नियुक्ती देण्यात येणार आहे.करीता सर्व उमेदवारांनी वंसतराव नाईक सभागृह जिल्हा परिषद,यवतमाळ येथे दिनांक ११/०९/२०२६ रोजी ठिक सकाळी ९.३० वाजता हजर राहण्याबाबत प्रसिध्दी देण्यात आली होती.

परंतु.प्रशासकीय कारणास्तव दि.११/०९/२०२६ रोजी होणारे समुपदेशन रद्य करण्यात आलेले आहे.सदर समुपदेशन दि.१५/०९/२०२६ रोजी वंसतराव नाईक सभागृह जिल्हा परिषद,यवतमाळ येथे ठिक सकाळी ९.३० वाजता ठेवण्यात आलेले आहे. सदर समुदेशनाच्या दिवशी उमेदवार अनुपस्थिती राहील्यास याबाबत सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील याची नोंद घ्यावी.

(प्रकाश मिश्रा)
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद यवतमाळ**

**प्रतिलिपी :-**

**जिल्हा माहिती अधिकारी यवतमाळ यांना माहितीस्तव.**

CamScanner